# प्रेसनोट

दिनांक – २६/०९/२०१८

## पुणे लोहमार्ग पोलीसांनी दरोडयाच्या तयारीत असलेल्या चार आरोपींना घातल्या बेडया. एकुण ५,२७,८५०/– रू. किमतीचा मुद्देमाल हस्तगत केला

दि. २६/०९/२०१८ रोजी पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशन कडील घातपात पथक व सर्व्हेलन्स पथक असे पुणे लोहमार्ग पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रातील रेकॉर्डवरील जबरी चोरी, मोबाईल चोरी, चैन स्नॅचींग मधील गुन्हेगारांना चेक करीत असतांना पो. शि. ७१३ समीर तांबोळी यांना रात्रौ. ०१.३० वा. चे सुमारास खब–या मार्फत खात्रीलायक बातमी मिळाली की, पुणे रेल्वे स्टेशन जवळील वाडीया कॉलेजच्या रेल्वे ब्रिजखाली अंधारामध्ये रेल्वे ट्रॅकच्या बाजूला अंधरात उजव्या बाजूला दरोडा टाकून रेल्वे प्रवाशांना लुटण्याकरिता काही इसम आपल्याजवळ घातक शस्त्र बाळगुन सदर ठिकाणी येणार असल्याबाबत बातमी मिळाल्याने सदर बातमीची माहिती पुणे लोहमार्ग पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मनोज खंडाळे यांना कळवीली असता त्यांनी सर्व्हेलन्स पथकातील दोन अधिकारी व कर्मचारी यांची दोन पथके तयार करून तात्काळ खबरी प्रमाणे घटनास्थळावर सापळा लावला असता नमुद वर्णनाचे ५ इसम पुणे रेल्वे स्टेशन जवळील वाडीया ब्रीजखाली आले असता सापळा पथकातील सर्वांनी सापळा आवळून सदर इसमांना ताब्यात घेत असतांना त्यातील एक इसम अंधाराचा फायदा घेवून पळून गेला व बाकीच्या चार जणांना ताब्यात घेवून त्यांना पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे घेऊन येवुन त्यांना त्यांची नावे विचारील असता त्यांनी त्यांची नावे १) आमीर आबीद शेख वय ३५ वर्षे राह. कसबानतत, थाना मंडी, जि. शामली राज्य. उत्तर प्रदेश २) इल्ताजा अब्दुल्ला शेख वय ३८, राह. सहारनपूर, सरायहिजामुद्दीन, शहानुरजी, थाना – जनतपूरी जि. सहारनपूर राज्य – उत्तरप्रदेश ३) अलीम दिलशाद शेख वय २६ वर्षे, राह. कमेलाकलोनी, सहारनपूर, थाना – मंडी, जि. सहारनपूर राज्य. उत्तरप्रदेश, व ४) नजाकतअली अब्दुलअजिज शेख वय ३२ वर्षे, राह. कालका पिंजोर, थाना – कालका, जि. पंचकुल्ला राज्य – हरियाना अशी असल्याची सांगितली. सदर आरोपीतांची पंचासमक्ष झडती घेतली असता त्यांचे जवळ एकुण ५,२७,८५०/– रू. किमतीचे विविध कंपण्यांचे ३३ मोबाईल फोन, एक ट्रॉली बॅग, एक सॅक बॅग, व १७५०/– रू. रोख तसेच एक लोखंडी सत्तूर, एक स्टीलचा रॉड व एक काळपट पांढ–या रंगाची दोरी, चार मास्क, एक कानटोपी असे दरोडा घालण्याचे साहित्य मिळुन आले असुन सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आले आहे. हस्तगत करण्यात आलेल्या ३३ मोबाईल बाबत आरोपीतांकडे चौकशी केली असता त्यांनी सदरचे मोबाईल हे दगडुशेठ हलवाईल गणपती परिसरामध्ये गणपती पाहण्यासाठी आलेल्या भाविकांचे चोरले असल्याचे सांगितले आहे. तसेच आज रोजी ते रेल्वेवर दरोडा टाकण्यासाठी आले असलेबाबत सांगितल्याने पो. शि. ७१३ समीर तांबोळी यांनी सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे गु.रं.नं १००८/२०१८ कलम ३९९, ४०२ भा. द. वि. आर्म अॅक्ट कलम ४ (२५) व मुंबई पोलीस कायदा कलम ३७ (१) सह १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असुन अटक आरोपीतांना पोलीस कोठडी रिमांडकामी मा. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो. लोहमार्ग न्यायालया, पुणे यांचे न्यायालयात हजर केले असता मा. न्यायालयाने अटक आरोपीतांना दि. २८/०९/२०१८ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर केली आहे. सदर गुन्हयाचा तपास सहा. पोलीस निरीक्षक, श्री. अमर कदम हे करीत आहेत.

उपरोक्त उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस अधीक्षक, लोहमार्ग पुणे श्री. दिपक साकोरे, मा. अपर पोलीस अधीक्षक, श्री. तुषार पाटील, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी, लोहमार्ग पुणे, विभाग श्री. नंदकुमार घोरपडे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री. मनोज खंडाळे, यांचे मार्गदर्शनाखाली सहा. पोलीस निरीक्षक, अमर कदम, पोलीस उप निरीक्षक, अनिल पासगे, पोलीस हवालदार – निशिकांत राऊत, शरद हरिहर, भिमा हगवणे, प्रशांत डोईफोडे, सुनिता राठोड, पोलीस नाईक – महेश पवार, तात्या कुलकर्णी, बमनाळीकर, चाबुकस्वार, शिर्के, पो. शि. समीर तांबोळी, इम्राण शेख, तुषार गेंगजे, प्रविण वाडेकर, सिद्धार्थ वाघमारे, तनवीर मुलाणी, बेबी थोरात, तुषार पवार, सदर्शन इप्पर, संजीव हासे यांनी केली आहे.